# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# शहरातील प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करा

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अंतर्गत अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू असून अण्णासाहेब मगर स्टेडियम व सिटी सेंटर भवन हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करावी, असे आदेश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

विधानमंडळ येथे विधानसभा उपाध्यक्ष श्री.बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी पिंपरी- चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण(पीएमआरडीए)चे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पुणे मेट्रोचे कार्यकारी संचालक श्रावण हर्डीकर दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.



मोरवाडी मेट्रोस्थानकाच्या जवळ दुचाकी वाहनांच्या पार्किंगची अडचण दूर करण्यात यावी व यासाठी पार्किंगसाठी देण्यात आलेल्या जागेचा विकास केला जावा, अशा सूचना विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केल्या.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगर विकास आराखड्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यात अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. यामध्ये सार्वजनिक वाहतूक, जल व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुविधा यांचा समावेश आहे याची माहिती देण्यात आली.

यासह पिंपरी चिंचवड शहरातील मेट्रोसाठी पार्किंग झोन आणि इतर सुविधा, शहराच्या विविध भागांना जोड मार्ग, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि पाण्याची टाकी. घनकचरा व्यवस्थापन व मैलाशुद्धीकरण प्रकल्पासाठी, अण्णासाहेब मगर स्टेडियम, संविधान भवनचे काम, औद्योगिक प्रशिक्षण संस्था उत्कृष्टता केंद्र यांची सविस्तर माहिती देण्यात आली.

पीएमआरडीएकडून पिंपरी-चिंचवड शहरात सुरू असलेल्या विकास प्रकल्पांच्या कामाचा देखील यावेळी आढावा घेण्यात आला.

इंद्रायणी नदी पात्रातील अनधिकृत बंगले प्रकरणी दोषींवर गुन्हे नोंदवण्यात यावेत

इंद्रायणी नदीच्या पात्रातील अनधिकृत 36 बंगले सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने पाडण्यात आले. या बंगल्यांचे बांधकाम करण्यापूर्वी महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी घेण्यात आली नव्हती. या प्रकरणात महानगरपालिकेच्या बीट निरीक्षकास निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे, यातील दोषी व्यक्तींवर गुन्हे नोंदवण्यात यावेत, अशा सूचना उपाध्यक्ष श्री.बनसोडे यांनी दिल्या.

### मेट्रो मार्गाचा विस्तार

» मेट्रो मार्गाचा विस्तार पिंपरी चिंचवड ते निगडी येथेपर्यंत केला जाणार असून या जवळपास साडेचार किलोमीटर लांबीच्या मेट्रो प्रकल्पाचा खर्च 910 कोटी रुपये आहे या मार्गावर तीन स्थानक प्रस्तावित आहेत. तसेच भक्ती शक्ती ते चाकण प्रस्तावित मेट्रो मार्गासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

# विविध नागरी समस्यांवर आमदार जगताप व आयुक्तांच्या उपस्थितीत बैठक संपन्न

## नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने बैठका घेण्यात येतील : आमदार शंकर जगताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरी समस्या, विकास प्रकल्प, वाहतूक आणि पायाभूत सुविधांसंदर्भातील अनेक मुद्द्यांवर आमदार शंकर जगताप आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यात विस्तृत चर्चा झाली. या बैठकीत महापालिकेच्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीस सहआयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपायुक्त मनोज लोणकर, पाणीपुरवठा व स्थापत्य विभागाचे प्रमुख अभियंता प्रमोद ओंबासे, सहशहर अभियंता देवअण्णा गट्टूवार व बापू गायकवाड यांच्यासह संबंधित अधिकारी सहभागी झाले होते.

**बैठकीत खालील प्रमुख मुद्द्यांवर चर्चा झाली:**

मोरया गोसावी मंदिरासमोरील दगडी रस्ता आणि पार्किंगची देखभाल व दुरुस्ती

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) ने महानगरपालिकेला ताथवडे पुनावळे वाकड परिसरातील सर्विस रस्त्याजवळील नाले कलव्हर्ट इत्यादी मोकळे व स्वच्छ करण्याबाबत केलेला पत्रव्यवहार. त्या दृष्टीने कारवाई करून पावसाळ्यात अंडरपास खाली जमणारे पाण्याचा निचरा करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याबाबत.

रिलायन्स कंपनीतर्फे दुरुस्तीच्या नावाखाली शहरातील फुटपाथ व इतर ठिकाणी टाकण्यात आलेल्या केबल्समुळे महानगरपालिकेचे



कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसानाची चौकशी संदर्भात कारवाई

महापालिका शिक्षकांच्या विविध मागण्या

कल्पतरू पिंपळे गुरव, पी.के चौक पिंपळे सौदागर, काळेवाडी अंडरपास व एमएम चौक पूल संदर्भातील प्रश्न

काळेवाडी चौकातील शिवसृष्टी ट्राफिक आयलंडचे काम सुरू करण्याचे नियोजन

वृक्षारोपणासाठी प्राईड पर्पलला देण्यात आलेली जागा भाडेपट्टा करार रद्द करून ताब्यात घेणे.

काळेवाडी एम एम चौक येथे ग्रेड सेपरेटर करणे

काळेवाडीत 'लेफ्ट फ्री' मार्गांची अंमलबजावणी

पशुसंवर्धन जागेत पार्क आणि रिव्हर फ्रंट रिझर्वेशन योजनेबाबत प्रगती

पुनावळे येथे ऑक्सीजन पार्क

नवविकसित गावांमध्ये पाण्याच्या टाक्यांसाठी आरक्षणाची पुनर्तपासणी

भूमकर चौकात प्रत्यक्ष पाहणी करुन पुन्हा आढावा घेण्याचा निर्णय

भूमकर चौकात ड्रेनेज लाईन टाकून दिल्यास वाहतुकीच्या दृष्टीने जागा ताब्यात येऊन वाहतूक समस्या सुटण्यास मदत होईल.

मेट्रो प्रकल्पासाठी काळा खडक येथील जुना जकात नाका ते वाकड पोलीस चौकी पर्यंत रस्ते काम आणि अतिक्रमण हटवण्याची सूचना

ताथवडे- पुनावळे रस्त्याच्या कामाची गती

प्रारूप विकास आराखड्याचे भाषांतर मराठीत करण्याची मागणी

एसटीपी कनेक्शन रद्द केल्यामुळे सोसायट्यांमध्ये निर्माण झालेला गोंधळ

वाल्हेकरवाडी स्मशानभूमीच्या मेरी या संस्थेचे सर्वेक्षण अहवाल आला असून त्या अनुषंगाने कामाचा आढावा

या बैठकीत नागरी समस्यांवर त्वरित उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. आमदार शंकर जगताप यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचना लवकरात लवकर प्रत्यक्षात आणण्याचा आग्रह धरला. तसेच नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने बैठका घेण्यात येतील, असेही ते म्हणाले.

# महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी पथक

## पोलिसांचे स्वतंत्र पथक स्थापन : पोलीसच बसमधून प्रवास करून छेडछाडीला आळा घालणार



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) बसने प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांनी स्वतंत्र पथक स्थापन केले आहे. या पथकातील पोलीस बसमधून प्रवास करून, छेडछाड आणि चोरी करणाऱ्यांवर लक्ष ठेवणार असल्याने महिला प्रवाशांचा प्रवास आता सुकर होणार आहे.

प्रवासात महिलांचे दागिने आणि पैसे चोरीला जाण्याचे प्रकार घडतात. तसेच महिलांकडे बघून अश्लील हावभाव करणे किंवा छेडछाड करणे, अशा घटना घडत असतात. या प्रकारांना पायबंद घालण्यासाठी पोलिसांचे स्वतंत्र पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकातील पोलीस कोणत्याही वेळी बसमधून प्रवास करून तपासणी करणार आहेत.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (पीएमआरडीए) उपनगरांच्या हद्दीपर्यंत वाहतूक सेवा देणारी 'पीएमपी' ३८१ मार्गिकांवरून धावते. दिवसाला आठ ते दहा लाख प्रवासी विविध मार्गावरून प्रवास करतात. प्रवासात चोरीसह अनुचित घटना घडत असल्याबाबत पीएमपी प्रशासनाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्या. या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांची नेमणूक करण्याची मागणी पीएमपीने केली होती. त्यानुसार पोलिसांकडून आता पथक नेमण्यात आले आहे.

### बस पोलीस ठाण्यात नेण्याच्या सूचना

» महिला किंवा विद्यार्थिनींना त्रास दिल्याचा प्रकार घडल्यास बस थेट जवळच्या पोलीस ठाण्यात घेऊन जाण्याचा आदेश पीएमपी प्रशासनाने वाहक आणि चालकांना दिला आहे. संबंधिताविरोधात तक्रार देऊन त्याची माहिती पीएमपीचा अपघात विभाग आणि पोलीस नियंत्रण कक्षाला कळविण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत.

### असे असेल पथक

» महिलांच्या सुरक्षिततेसाठी तयार करण्यात आलेल्या पथकामध्ये दोन पोलीस निरीक्षक, एक सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि २२ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

> शहर पोलिसांनी स्वतंत्र पथक स्थापन करून 'पीएमपी'तील वर्दळ असणाऱ्या स्थानक आणि मार्गांवर गस्त घालण्याचा निर्णय घेतला आहे. या पथकातील पोलिसांकडून बसने प्रवास करून लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे महिला प्रवाशांना सुरक्षितपणे प्रवास करता येणार आहे.
>
> **- सतीश गव्हाणे, मुख्य व्यवस्थापक, संचलन विभाग, पीएमपी.**

# रिवा-पुणे एक्सप्रेस आता आठवड्यातून एक दिवस

## जबलपूर-रायपूर दरम्यान आठवड्यातून सहा दिवस वंदे भारत ट्रेन सुरु करण्यात येणार




**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आठवडाभरापूर्वी रिवा-पुणे-रिवा, जबलपूर-रायपूर व भोपाळ-बंगळूर या तीन रेल्वे लवकरच सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यापैकी आता रिवा-पुणे-रिवा या रेल्वेचे संभाव्य वेळापत्रक रेल्वे विभागाने जाहीर केले आहे. ही रेल्वे सध्या आठवड्यातून एक दिवस (दर मंगळवारी) धावणार आहे. यामुळे महाराष्ट्रासह मध्यप्रदेशातील प्रवाशांना सुद्धा मोठा दिलासा मिळाला आहे.

हावडा-मुंबई मार्गावरील गोंदिया रेल्वे स्थानक हे महत्त्वपूर्ण स्थानक म्हणून ओळखले जाते. या रेल्वे स्थानकावरून दोन्ही दिशेला ४९ वर मेल, एक्सप्रेस, लोकल, पॅसेंजर गाड्या धावतात. तर दररोज दहा हजारांवर प्रवासी गोंदिया रेल्वे स्थानकावरून प्रवास करतात. हे रेल्वे स्थानक मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्याला लागून असल्याने प्रवाशांना सुद्धा या रेल्वे स्थानकाची मदत होते. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गेल्या आठवडचात या मार्गावर तीन रेल्वे गाड्या सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यापैकी रिवा-पुणे-रिवा या रेल्वे गाडीचे संभाव्य वेळापत्रक रेल्वे विभागाने जारी केले आहे.

रिवा-पुणे-रिवा या गाडीला २०१५२ व २०१५१ हा क्रमांक दिला आहे. ही गाडी दर मंगळवारी सकाळी ६:४५ वाजता रिवा रेल्वे स्थानकावरून पुणे साठी सुटेल. यानंतर सकाळी ७:३८ वाजता सतना, मैहर ८:१७, कटनी ९:२५ , जबलपूर सकाळी ११:०४ वाजता, मदनमहल सकाळी ११:०७, नैनपूर दुपारी १:३४ वाजता, बालाघाट दुपारी ३:१५ वाजता, गोंदिया दुपारी ४:०१ वाजता, नागपूर सायंकाळी ६:२० वाजता व पुणे येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ९:४५ वाजता पोहचेल.

त्यानंतर हीच गाडी पुणे येथून बुधवारी दुपारी ३:१५ वाजता रिवासाठी रवाना होईल. गुरुवारी पहाटे ५:२५ वाजता नागपूर, गोंदिया सकाळी ७:४५ वाजता, बालाघाट ८:४६ वाजता, नैनपूर १०:१८ वाजता, मदनमहल दुपारी १२:४३ वाजता, जबलपूर दुपारी १२:४७ वाजता, कटनी दुपारी २:३५ वाजता, मैहर दुपारी ३:५० वाजता, सतना ४:३२ वाजता व रिवा येथे सायंकाळी ५:३० वाजता पोहचेल. या घोषित तीन पैकी उर्वरित दोन गाड्यांचे वेळापत्रक सुध्दा लवकरच जाहीर करणार असल्याचे सांगितले आहे.

### आता जबलपूर-रायपूर वंदे भारतची प्रतीक्षा

» जबलपूर-रायपूर दरम्यान आठवड्यातून सहा दिवस वंदे भारत ट्रेन सुरु करण्यात येणार आहे. या गाडीचे सुध्दा संभावित वेळापत्रक तयार झाले आहे. ही गाडी जबलपूर येथून पहाटे ५:१२ वाजता सुटेल यानंतर ही गाडी सकाळी ९:१० वाजता गोंदिया आणि ११:५५ वाजता रायपूर पोहचेल. तर रायपूर हून दुपारी १:३० वाजता सुटेल आणि गोंदियाला दुपारी ३:५५ वाजता व जबलपूरला रात्री ८:१५ वाजता पोहचणार आहे. मात्र ही गाडी नेमकी केव्हापासून सुरु होणार हे रेल्वे विभागाने अद्याप जाहीर केलेले नाही. त्यामुळे या गाडीची सुध्दा प्रवाशांना प्रतीक्षा आहे.

# पिंपरी चिंचवड 'आरटीओ'त फिटनेस तपासणी कासवगतीने !

## जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत केवळ ३३७ शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण झाले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड 'आरटीओ'त जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत केवळ ३३७ शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण (फिटनेस तपासणी) झाले आहे. अजूनही शालेय वाहतूक करणाऱ्या बऱ्याच वाहनचालकांनी ही तपासणी केली नाही. शाळा सुरु होण्यासाठी अवघे तीन दिवस राहिले असून, त्यापूर्वी राहिलेल्या वाहनांची फिटनेस तपासणी होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

राज्यातील सीबीएससी शाळा ९ जून रोजी आणि राज्य मंडळाच्या शाळा १६ जूनपासून सुरु होणार आहेत. त्यामुळे शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांची योग्य तपासणी होणे गरजेचे आहे. मात्र, याकडे म्हणावे तितके गांभीर्याने पाहिले जात नाही. एखादी दुर्घटना घडली तरच प्रशासन खडबडून जागे होते. त्यानंतर 'आरटीओ'कडून जुजबी कारवाई केली जाते. कालांतराने परिस्थिती 'जैसे थे' होते. आता शाळा सुरु होण्यापूर्वी शालेय गाड्यांची फिटनेस तपासणी वेळेत होणार का, शहरातील अवैध शालेय वाहतूक थांबणार का, स्कूल व्हॅनमधील मुलांची कोंबा-कोंबी थांबणार का, मोटार वाहन कायद्यातील नियमांचे पालन होणार का, यासोबतच 'आरटीओ'ची तपासणी आणि कारवाईत सातत्य राहणार का, असे विविध प्रश्न सध्या उपस्थित होत आहेत.




### स्कूल व्हॅनमध्ये क्षमतेपेक्षा जास्त मुले

» शहरात अनधिकृतरीत्या शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक जोमात सुरू आहे. त्यातच भर म्हणजे स्कूल व्हॅनचालक आसन क्षमतेपेक्षा अधिक मुले आपल्या स्कूल व्हॅनमध्ये कोंबत आहेत. नियमानुसार ७ लहान मुलांची वाहतूक करण्याचा नियम आहे. मात्र, एकाच व्हॅनमध्ये १५ ते २० मुलांची वाहतूक करण्यात येत आहे. यावर नियंत्रण कोणाचे?

### 'आरटीओ'चे दुर्लक्ष !

मोटार वाहन कायद्यानुसार स्कूल बस, स्कूल व्हॅनला काही अटी शर्तींची पूर्तता करून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यासाठी परवाने देण्यात येतात. मात्र, तरी देखील काही खासगी व्हॅन विना परवाना स्कूल व्हॅनमार्फत शालेय वाहतूक करताना पहायला मिळतात. खासगी स्कूल व्हॅनचा रंग पिवळा नसतो, त्यांच्याकडे विद्यार्थी वाहतुकीचा परवाना नसतो. असे असतानाही आरटीओ अधिकारी काणाडोळा करत असल्याचे दरवर्षी दिसते.

### शालेय विद्यार्थी वाहतूक करण्याचे नियम

- » शालेय विद्यार्थी वाहनाला वाहतूक परवाना आवश्यक
- » वाहनाचा रंग पिवळा हवा
- » शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनात महिला सहाय्यक हवी.
- » अंतर्गत आसन व्यवस्था चांगली असावी, त्याचबरोबर आसनाच्या बाजूला हँडल असावेत
- » अग्निशामक उपकरण बसविणे आवश्यक
- » बसमध्ये उभे राहिल्यास धरण्यासाठी हँडल
- » खिडकीच्या बाहेरील बाजूस आडवे लोखंडी बार
- » आपत्कालीन दरवाजा
- » धोक्याचा इशारा देणारे पॅनिक बटन
- » गाडीवर विद्यार्थ्यांचे चित्र
- » वाहनांचा इन्शुरन्स
- » आसनाच्या मागच्या बाजूस हँडल आवश्यक
- » प्रथमोपचार पेटी
- » चालकाचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र
- » वाहन ट्रॅकिंग प्रणाली

"आरटीओत शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची फिटनेस तपासणी सुरु आहे. पण, जर विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या संघटनांनी 'आरटीओ'कडे मागणी केल्यास स्पेशल ड्राईव्ह आयोजित करून, त्या वाहनांचे फिटनेस तपासणी करु.

- राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड आरटीओ

---

# पालिकेकडून पाच हाऊसिंग सोसायटीचे पाणी बंद; एसटीपी बंद असल्याने कारवाई

## आत्तापर्यंत एकूण 5 हाऊसिंग सोसायट्यांचे नळजोड महापालिकेकडून खंडित करण्यात आले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांना सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक असतानाही 184 सोसायट्यांमधील मैलासांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) बंद असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे. अशा हाऊसिंग सोसायट्यांचे नळजोड तोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आत्तापर्यंत एकूण 5 हाऊसिंग सोसायट्यांचे नळजोड महापालिकेकडून खंडित करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाने 2 डिसेंबर 2020 च्या नवीन एकत्रित बांधकाम व विकास नियमावलीनुसार (यूडीसीपीआर) राज्यातील 20 हजार चौरस मीटर, त्यावरील मोठ्या क्षेत्रफळाच्या बांधकामांना, 100 सदनिका असलेल्या दीड हजार चौरस मीटर बांधकाम असलेल्या किंवा दररोज 20 हजार लिटर पाण्याचा वापर करणाऱ्या हाऊसिंग सोसायटी, शैक्षणिक संस्था, औद्योगिक, व्यापारी, सरकारी व निमसरकारी संस्था, हॉटेल, ग्रे वॉटर ट्रीटमेंटनुसार सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक केले आहे. एसटीपी न उभारणाऱ्या सोसायट्या आणि आस्थापनांवर कारवाईचे अधिकार महापालिकेस देण्यात आला आहे. 'ब' आणि 'क' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील प्रत्येकी 2, 'फ' क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रातील एका हाऊसिंग सोसायटीचे नळजोड तोडण्यात आला आहे. नळजोड खंडित करण्याची कारवाई होऊ नये म्हणून हाऊसिंग सोसायट्यांनी तात्काळ एसटीपी सुरू करावेत, असे आवाहन मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी केले.

शहरात एकूण 456 मोठ्या हाऊसिंग सोसायट्या आहेत. यातील 264 सोसायट्यांत एसटीपी सुरू आहेत. उर्वरित 184 सोसाट्यांमधील एसटीपी विविध कारणांनी बंद आहेत. त्यांना वारंवार नोटीस बजावूनही प्रतिसाद दिला जात नाही. तर, 8 सोसायट्यांनी महापालिकेच्या पथकास सोसायटीमध्ये प्रवेश दिला नाही.



### या प्रकल्पांसाठी वापरला जाणार निधी

» 1 जूनपासून तोडण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहेत. त्यानुसार पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडून कारवाईस मंगळवार (दि.3)पासून सुरुवात करण्यात आली आहे. 'ब' आणि 'क' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील प्रत्येकी 2, 'फ' क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रातील एका हाऊसिंग सोसायटीचे नळजोड तोडण्यात आला आहे. नळजोड खंडित करण्याची कारवाई होऊ नये म्हणून हाऊसिंग सोसायट्यांनी तात्काळ एसटीपी सुरू करावेत, असे आवाहन मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी केले

# फक्त पाच रुपयांत देशी प्रजातीच्या वृक्षांचे वाटप

## महापालिका वन महोत्सव, दरवर्षी 35 ते 40 हजार रोपे विकली जातात, 15 ऑगस्टपर्यंत मोहीम

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात हिरवळ वाढविण्यासाठी, मोठ्या प्रमाणात झाडे लावण्यासाठी आणि नागरिकांना झाडे लावण्यास प्रोत्साहित करण्यासाठी, पुणे महापालिका गेल्या २८ वर्षांपासून सातत्याने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वन महोत्सवाचे आयोजन करत आहे. या वन महोत्सवात स्थानिक प्रजातींच्या झाडांची रोपे कमी किमतीत म्हणजेच फक्त ५ रुपयांना विक्री केली जाते.

शहरात हिरवळ वाढविण्यासाठी, मोठ्या प्रमाणात झाडे लावण्यासाठी आणि नागरिकांना झाडे लावण्यास प्रोत्साहित करण्यासाठी, पुणे महापालिका गेल्या २८ वर्षांपासून सातत्याने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वन महोत्सवाचे आयोजन करत आहे. या वन महोत्सवात स्थानिक प्रजातींच्या झाडांची रोपे कमी किमतीत म्हणजेच फक्त ५ रुपयांना विक्री केली जाते. दर वर्षी या वन महोत्सवात स्थानिक प्रजातींच्या ३५ ते ४० हजार रोपांचे वाटप केले जाते. या वर्षीही पुणे महापालिकेच्या वतीने शहरातील जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज उद्यानात वन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ५ जून ते १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे.

पुणे शहराचा विकास आणि नागरीकरण झपाट्याने होत आहे. शहरातील पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी आणि शहरातील निरोगी तापमान राखण्यासाठी, मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण आणि संवर्धन ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, पुणे महापालिकेमार्फत वृक्ष प्राधिकरण आणि फलोत्पादन विभाग शिवाजीनगर येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यानात वन महोत्सवाचे आयोजन करतात.

दरवर्षी अंदाजे ३५ ते ४० हजार रोपे वाटली जातात. वन महोत्सवांतर्गत, ५ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत, नागरिकांना एक ते दीड फूट उंचीची स्थानिक रोपे फक्त पाच रुपयांमध्ये उपलब्ध करून दिली जातात. शहरातील अनेक भागातील लोक स्थानिक प्रजातींची रोपे खरेदी करण्यासाठी येतात. शहरात मोठ्या प्रमाणात झाडे लावून शहराचे हिरवेगार आच्छादन वाढविण्यात हातभार लावण्याचे आवाहन केले. या वन महोत्सवात वाटण्यात येणारी सर्व रोपे पाषाण आणि वाकडेवाडी येथील पालिकेच्या रोपवाटिकांमध्ये लावली जातात, असे घोरपडे म्हणाले. शहरातील सर्व पर्यावरणप्रेमी नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांना या वृक्षारोपण मोहिमेत सामील होण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.



### सर्व पर्यावरणप्रेमी नागरिकांना आवाहन

**» हा वन महोत्सव सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत खुला राहील. अशोक घोरपडे यांनी शहरातील सर्व नागरिकांना या वन महोत्सवाचा लाभ घेण्याचे आणि शहरात मोठ्या प्रमाणात झाडे लावून शहराचे हिरवेगार आच्छादन वाढविण्यात हातभार लावण्याचे आवाहन केले. या वन महोत्सवात वाटण्यात येणारी सर्व रोपे पाषाण आणि वाकडेवाडी येथील पालिकेच्या रोपवाटिकांमध्ये लावली जातात, असे घोरपडे म्हणाले. शहरातील सर्व पर्यावरणप्रेमी नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांना या वृक्षारोपण मोहिमेत सामील होण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.**

### एक ते दीड फूट उंचीची स्थानिक रोपे

**» याबाबत उद्यान विभागाचे प्रमुख अशोक घोरपडे म्हणाले की, पुणे महापालिका गेल्या २८ वर्षांपासून या वन महोत्सवाचे आयोजन करत आहे. या मोहिमेला पुण्यातील नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळतो. दरवर्षी अंदाजे ३५ ते ४० हजार रोपे वाटली जातात. वन महोत्सवांतर्गत, ५ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत, नागरिकांना एक ते दीड फूट उंचीची स्थानिक रोपे फक्त पाच रुपयांमध्ये उपलब्ध करून दिली जातात. शहरातील अनेक भागातील लोक स्थानिक प्रजातींची रोपे खरेदी करण्यासाठी येतात.**

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनाकडे सगळ्यांचे लक्ष

## १० जूनला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन असल्याने मोठी राजकीय घडामोड घडणार असल्याची चर्चा आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात सध्या एकीकडे ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याची चर्चा तर दुसरीकडे पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मनोमिलन होणार असल्याच्या चर्चांना पेव फुटले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याची चर्चा केली जात आहे. अशातच १० जूनला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन असल्याने मोठी राजकीय घडामोड घडणार असल्याची देखील चर्चा आहे.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वर्धापन दिन असल्याने या दिनाने औचित्य साधत एकत्र येणार अशीही एक चर्चा सुरू आहे. मात्र, याउलट दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त जोरदार तयार करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुल येथे मोठ्या थाटात यंदाचा वर्धापन दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. हा कार्यक्रम आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी अत्यंत महत्वाचा मानला जात आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून पक्षाचे अध्यक्ष अजित पवार हे दिशा निवडणुकीच्या दृष्टीने दिशा काय असेल याची माहिती देणार आहे. या कार्यक्रमासाठी विविध जिल्ह्यांमधून कार्यकर्त्यांची मोठी फौज पुण्यात दाखल होण्याची शक्यता आहे.



### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनाकडे सगळ्यांचे लक्ष

**» दोन्ही पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मोठी कंबर कसली आहे. नुकतीच यांसदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तयारीला लागण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. एकाच शहरात, काही अंतराने होणारे हे दोन कार्यक्रम म्हणजे एकप्रकारचं राजकीय शीतयुद्ध होणार असल्याचे बोलले जात आहे.**

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने देखील वर्धापन दिनाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह पक्षाचे सर्व खासदार, आमदार व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याची चर्चा केली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन असल्याने मोठी राजकीय घडामोड घडणार असल्याची देखील चर्चा आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वर्धापन दिन असल्याने या दिनाने औचित्य साधत एकत्र येणार अशीही एक चर्चा सुरू आहे.